# B.A. B.Ed. (Semester – VI) Examination, April/May 2018
## MARATHI (Paper – X)
## प्रसारमाध्यमांसाठीची लेखनकौशल्ये
## Writing Skills for Media

Duration : 2 Hours | Total Marks : 70

*सूचना : उत्तरपत्रिकेत कोठेही आपल्या नावाचा उल्लेख करू नये.*

1. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **(3×5=15)**

   1) चित्रपट परीक्षण करताना कोणत्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात ?

   2) ग्रंथ परीक्षण लिहिण्यामागचा उद्देश्य कोणता असतो ?

   3) नाट्यपरीक्षण लिहिताना नाटकाच्या घटकाचा विचार का करावा लागतो ?

   4) 'वाचकांचा पत्रव्यवहार' सदराला वर्तमानपत्रात का महत्व असते ?

   5) मुद्रितशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही सहा खुणा त्यांच्या अर्थासहित स्पष्ट करा.

2. खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **(3×5=15)**

   1) संपादनासाठी संपादकाजवळ कोणते गुण आवश्यक असतात ?

   2) भाषांतरकारासमोर येणाऱ्या महत्वाच्या अडचणी कोणत्या ?

   3) भाषांतर म्हणजे काय ते सांगून त्याचे प्रकार लिहा.

   4) पटकथा म्हणजे काय ?

   5) विशेषांकाच्या शीर्षकपृष्ठात कोणते घटक असायला हवेत ?

3. तुम्ही पाहिलेल्या कोणत्याही एका मराठी चित्रपटाचे परीक्षण लिहा. **10**

   **किंवा**

   तुम्हाला आवडलेल्या एका मराठी नाटकाचे परीक्षण लिहा.

4. अ) 'समाजात महिलांवर होणारा वाढता अत्याचार' हा दैनिक 'आम्ही सावित्री' मधून प्रसिद्ध झालेला लेख आवडला, त्या विषयीची प्रतिक्रिया व्यक्त करणारे पत्र 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरासाठी लिहा. **5**

**किंवा**

सरकारने मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देण्याची विनंती करणारे पत्र दैनिक 'जागृती' मधील 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरासाठी तयार करा.

ब) पुढे दिलेल्या मूळ उताऱ्याच्या आधारे त्याखालील मुद्रित उताऱ्याचे मुद्रितशोधन करा. **5**

मूळ उतारा

मोटारीतून उतरून संध्याकाली आम्ही ज्या घरांच्यामधल्या पाणंदीतून आत आलो होतो, त्याच पाणंदीतून आम्ही त्यांच्या घरी गेली. घरात जायला दोन दारं होती. एक त्यांच्या अभ्यासाच्या खोलीजवळचं. दुसरं रस्त्याजवळचं. तटकी उघडून आत जायचं. तिथं खळं. तिथून आत गेलं की एकावर एक अशा दोन पडव्या.

मुद्रित उतारा

मोटारितून उतरून संध्याकाळी आम्हि ज्या घरांच्या मधल्या पाणदीतुन आत आलो होतो, तेच पाणदीतून आम्ही त्यांच्या घरी गेले. घरत जायला दोन दारं होती एक त्यांच्या अभ्यासा च्या खोलीजवळचं. दुसरा रस्त्याजवळचं. तटकी उघडून आत जायाचं. तीथं खळं तिथून आत गेलं किएकावर एक अशा दोन पडव्या.

5. अ) युवा साहित्यसंमेलनामित्त प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेचे शीर्षकपृष्ठ व अनुक्रमणिका तयार करा. **10**

**किंवा**

ब) पुढील कथानकाच्या आधारे पटकथा लिहा.

एका गावातील आजी आणि माजी सरपंच या दोघांत वैमनस्य. गावात चालणाऱ्या रेड्यांच्या झुंजीत दोघांचे रेडे आहेत. या 'धिरियो' मध्ये त्यांच्या रेड्यांची झुंज लावली जाते. त्या रेडयांना झुंजवताना हे दोघेही परस्परांची उणीदुणी काढतात. रेड्यांना मारून त्यांच्या अंगावर बर्फाचे पाणी फेकून झुंज देण्यासाठी प्रवृत्त करतात.रक्तबंबाळ झालेले रेडे शेवटी आपल्या मालकांच्यावर उलटतात व त्यांना जखमी करून पळून जातात.

6. पुढील इंग्रजी उताऱ्याचे **मराठीत** भाषांतर करा. **10**

Mahatma Gandhi understood the service ethic better than most. In one memorable story from his life, he was traveling across India by train. As he left the car he had been riding in, one of his shoes fell to a place on the tracks well beyond his reach. Rather than worrying about getting it back, he did something that startled his traveling companions; he removed his other shoe and threw it to where the first one rested. When asked why he did this. Gandhi smiled and replied "Now the poor soul who finds the first one will have a pair that he can wear".